**<u>वादीचा उर्वरित सरतपास त्यांच्यातर्फे वकील श्री.जी.जी.टांक्रर यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

**१५.** या दाव्यामध्ये प्रतिवादींवर बजावणी होवून देखील त्यांनी त्यांच्या वकिलांना नेमूनही ते दाव्याच्या कामी हजर राहत नाहीत. सदर दाव्याच्याकामी 'कैफियत नाही' असा प्रतिवादीविरुध्द आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर मी सदरकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर दाव्याच्या कामी मी दावा दाखल करतेवेळी निशाणी ४ सोबत काही कागदपत्रे अपलोड केलेली आहेत व मूळ कागदपत्र न्यायालयात हजर केलेली आहेत. सदर मूळ कागदपत्र मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. (साक्षीदाराला निशाणी ४/१ कडील वेंगुर्ला नगरपरिषद इमारत क्र. २७, वॉर्ड क्र. ५ मालमत्ता कर आकारणी सर्वेक्षण उतारा दाखविण्यात आला.) हा तोच आहे, त्यावर मुख्याधिकारी नगर परिषद वेंगुर्ला यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>(सदर मालमत्ता कर आकारणी सर्वेक्षण उतारा निशाणी १२ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/२ कडील वेंगुर्ले शहर भूमापन क्रमांक व उपविभाग २९६/४ च्या सातबारा उताऱ्याची सहीसूद प्रत दाखविण्यात आली.) ही तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **<u>(सदरचा दस्तऐवज हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी १३ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/३ येथील प्रतिवादी क्र. १ सौ. दिपाली गावडे हिला वादीचे वकिलांनी दि.११/०१/२०२३ रोजी दिलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली.) ती तीच आहे. त्यावर माझे विधीज्ञ श्री. जी.जी. टांक्रर यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **<u>(सदरच्या नोटीसीच्या कार्यालयीन प्रतीस त्यास निशाणी १४ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/४ येथील प्रतिवादी क्र. १ सौ. दिपाली गावडे हिला नोटीस पोहोचल्याबाबतची पोस्टाची पोहोच पावती दाखविण्यात आली.) ती तीच आहे. त्यावर प्रतिवादी क्र. १ सौ.दिपाली दिनकर गावडे हिची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **<u>(सदरच्या नोटीसीच्या पोस्टाच्या पोहोच पावतीस निशाणी १५ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/५ येथील प्रतिवादी क्र.२ दिनकर गावडे यांना नोटीसीची प्रत पोहोचल्याबाबतची पोस्टाची पोहोच पावती दाखविण्यात आली.) ती तीच आहे. त्यावर प्रतिवादी क्र. २ दिनकर गावडे यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **<u>(सदरच्या नोटीसीच्या पोस्टाच्या पोहोच पावतीस निशाणी १६ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/६ कडील वेंगुर्ला नगरपरिषद इमारत क्र. २७, वॉर्ड क्र.७ मालमत्ता कर आकारण सर्वेक्षण उतारा दाखविण्यात आला.) हा तोच आहे, त्यावर मुख्याधिकारी नगर परिषद वेंगुर्ला यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>(सदर मालमत्ता कर आकारण सर्वेक्षण उताऱ्यास निशाणी १७ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/७ कडील प्र.दुय्यम निबंधक श्रेणी–१, वेंगुर्ले यांच्याकडील मूल्यांकनाची फी भरल्याबाबत पावती क्र. १११५ दाखविण्यात आला.) ही तीच आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **<u>(सदरचा दस्तऐवज हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी १८ देण्यात येते.)</u>** (साक्षीदाराला निशाणी ४/८ कडील मूल्यांकन पत्र शहरी क्षेत्र बांधीव

स.नं.२९६ मधील इमारत क्र. २७ दाखविण्यात आले.) हे तेच आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदरचा दस्तऐवज हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी १९ देण्यात येते.)** (साक्षीदाराला निशाणी ४/९ येथील त्यांच्या वकिलांतर्फे मुख्याधिकारी नगरपरिषद वेंगुर्ले यांना दिलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली.) ही तीच आहे, त्यावर लिपीक नगरपरिषद वेंगुर्ला यांची सही आहे. त्यावर दि. ०७/१२/२०२२ ही तारीख घातलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकिलांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **(सदरच्या नोटीसीच्या कार्यालयीन प्रतीस त्यास निशाणी २० देण्यात येते.)** (साक्षीदाराला निशाणी ४/१० येथील प्रतिवादी क्र. १ सौ. दिपाली गावडे हिला वादीचे वकील ॲड. दिनकर वडर यांनी दिलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखविण्यात आली.) ती तीच आहे. त्यावर माझे विधीज्ञ श्री.दिनकर वडर यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे **(सदरच्या नोटीसीच्या कार्यालयीन प्रतीस त्यास निशाणी २१ देण्यात येते.)** (साक्षीदाराला निशाणी ४/११ येथील प्रतिवादी क्र. १ सौ. दिपाली गावडे हिला नोटीस पोहोचल्याबद्दलची तिची सही असलेली स्पीड पोस्टाची पोहोच पावती दाखविण्यात आली.) ही तीच आहे. त्यावर प्रतिवादी क्र. १ ची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदरच्या नोटीसीच्या कार्यालयीन प्रतीस त्यास निशाणी २२ देण्यात येते.)** (साक्षीदाराला निशाणी ४/१२ येथील प्रतिवादी क्र. १ सौ. दिपाली गावडे हिला नाहरकत देणार जोत्स्ना बोवलेकर हिने दिलेल्या नाहरकत पत्राची छायाकिंत प्रत दाखविण्यात आली.) सदरची प्रत मला प्रतिवादी क्र. २ ने दिलेली आहे. त्यावेळेस त्यांच्यासोबत प्रतिवादी क्र. १ ही हजर होती. (साक्षीदाराला निशाणी ४/१४ येथील वेंगुर्ला नगरपरिषद हद्दीतील सर्वे नं. २९६ हिस्सा नं. ४ चा सातबारा उताऱ्याची सहीसूद प्रत दाखविण्यात आली.) ही तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदरचा दस्तऐवज हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी २३ देण्यात येते.)** (साक्षीदाराला निशाणी ४/१५ येथील वेंगुर्ला नगरपरिषद हद्दीतील फेरफार क्र.१५०५८ ची सहीसूद प्रत दाखविण्यात आली.) ही तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदरचा दस्तऐवज हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी २४ देण्यात येते.)**

**(वादीचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर स्विकृत,

DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2024.06.13 15:01:23 +0530

(डी.वाय.रायरीकर)

दिनांक– १३/०६/२०२४. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.